आंबटचुका, कांदा यांचं बी टोपलं. मधल्या १२ मोकळ्या सऱ्यांमध्ये भेंडी (२), गवार (१), कोबी (२), फ्लॉवर (३), टोमॅटो (३.५), ढोबळी मिरची (.५) याप्रमाणे बी / रोप लावलं. कोबी व फ्लॉवरच्या रोपात मधूनमधून झेंडूची रोपं लावली. टोमॅटो व ढोबळीची रोपं सरीच्या एकाच बाजूला असल्याने दुसऱ्या बाजूला काही पालेभाज्यांचं बी टोपलं. चाकवत पावसाने फुकट गेला. तिथे नंतर काकडी लावली.

सरी काढण्यापूर्वी जमिनीत अंदाजे १ टन शेणखत पसरलं. याशिवायच्या खत – औषधींची यादी स्वतंत्रपणे दिली आहे. या रानाला फक्त दोन वेळा पाणी दिलं आहे. जास्त पावसामुळे खुरपणीचा खर्च फार वाढला.



'सेंद्रिय सेतू' गटात भाज्यांचं वाटप केलेलं आहे. त्यात कांदापात आमच्याकडे नाही. कांद्याचं बी शिल्लक होतं, ते लावलं. भानुदास यांच्याकडे कांदापात दिलेली आहे. त्यांची तयार होऊन विक्रीला यायला सुरुवात झाल्यावर आम्ही बंद केली. उरलेल्या रोपांची दुसरीकडे पुनर्लागण केली आहे. त्या कांद्याचं उत्पन्न यथावकाश मिळेल.

आमच्याकडे पर्जन्यमापक असून रोज सकाळी ८ वाजता आधीच्या २४ तासांतला पाऊस मोजून नोंदून ठेवला जातो. यंदा आतापर्यंत जून : २१८, जुलै : ७२, ऑगस्ट : ११२ व सप्टेंबर : १९९ असा एकूण ६०१ मि. मी. पाऊस झाला आहे. या भागाची वार्षिक सरासरी १२ इंच म्हणजे ३०० मि. मी. आहे; पण गेल्या दोन – तीन वर्षांपासून 'हवामान बदल' या सदरात 'बराच जास्त पाऊस' या घटकाचीही नोंद करावी लागत आहे. त्यामुळे वरुन पाणी फार द्यावं लागलं नाहीच; पण पाणी साठल्यामुळे खालच्या भागातील भाज्या उपळून १० – १५ टक्के नुकसानच झालं.

**सारांश : 'सेंद्रिय सेतू'** मार्फत सेंद्रिय शेतीमालाच्या विक्रीची व्यवस्था उभी केल्यामुळे दि. २ जुलै २०१० रोजी उसाची लागण केल्यापासून ३ महिन्यांच्या आत आंतरपिकांसह उसाचा आतापर्यंतचा उत्पादन खर्च भरुन ८७६० रुपये वर शिल्लक राहिले आहेत.

या एकूण आकडेवारीमुळे सेंद्रिय शेतीवरचा माझा विश्वास दृढ झाला आहे. असाच विश्वास आमचे ग्राहकही दाखवतात, हे आवर्जून नमूद करायला हवं. सेंद्रिय असो किंवा पारंपरिक, कोणीही शेतकऱ्यांनी आमच्या शेतीला भेट द्यावी व आम्हाला अजून मार्गदर्शन करावं, ही अपेक्षा आहे.

या दिवाळीनिमित्त शेतकऱ्यांशी सेंद्रिय शेतीबाबत संवाद साधताना माझ्या मनात एक आशेचा दीप तेवतो आहे. भविष्यात सेंद्रिय शेतीबाबत शेतकरी अधिक जागरुक होतील. मला उमगलेली सेंद्रिय शेती माझ्या शेतकरी बंधूंनाही उमजून यावी, हीच शुभेच्छा !

**३० सप्टेंबर २०१० पर्यंत झालेला एकूण खर्च रुपये :**

मशागत : ३६२० लागवण खर्च : ९२७ खुरपणी व इतर : ५३८० पाणी (पाणीपट्टीसह) ४४४

काढणी व पश्चात : ३१९७ निविष्टा : १२१४५ (बियाणे (ऊस बेणे व इतर) : ७१९४ + खते : ३५००+ औषधे : १४५१)

**एकूण : २५७१३ + १०% व्यवस्थापन खर्च : २५७१.०० = एकूण खर्च रुपये २८२८४.००**

**३० सप्टेंबर २०१० पर्यंत मिळालेले भाजीपाल्याचे उत्पादन : एकूण १८९०.५८ किलो**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कोथिंबीर : २३४.३७ | लाल माठ : १००.६१ | मेथी : २८.४ | भेंडी : २४७.४६ | शेपू : १२६.८४ |
| गवार : २१.८५ | पालक : २०४.६३ | कांदापात : २६.२ | कोबी : ३१६ | बीट : १३.९६ |
| फ्लॉवर : २४६.७ | टोमॅटो : २१९.७ | ढोबळी : ४.४५ | मुळा : १२.२१ | काकडी : ८७.२ |

उत्पन्न : सदर भाज्यांची विक्री 'सेंद्रिय सेतू' मार्फत होत असल्याने सर्वांचा दर : रु. २८.०० प्रतिकिलो आहे.

(विक्रीभाव : प्रतिकिलो रु. ४०.०० – १२.०० (३०% वाहतूकखर्च व विक्रीखर्च) = रु. २८.००) : नेलेल्यापैकी ७०% भाज्या विकल्या गेल्या,असे धरु. १८९० कि. × ०.७ = १३२३ कि. × २८ = ३७०४४.००

**उत्पन्न रु. ३७०४४.०० – खर्च रु. २८२८४.०० = नफा रु. ८७६०.००**

सेंद्रिय सेतू शेतकरी बचतगट, द्वारा नवनिर्माण न्यास,
पारगाव (सालोमालो), ता. दौंड, जि. पुणे – ४१२ २०३
मो. नं. ९०११०३४९५०
ajitvasudha@yahoo.com
लेखिका सेंद्रिय कृषिमाल विक्री संस्था 'सेतू' च्या
संस्थापक सदस्या असून कृषी विक्री कौशल्य विषयाच्या अभ्यासक आहेत.